`

बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २२ जूलै २०२५**

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४०३/२०२५ भा.न्या.सहिता कलम ११८(१),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/०७/२०२५ रोजी १४.३० वा चे सुमारास, बेगम पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०७/२०२५ रोजी १९.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शोएब अख्तर जाकीर हुसेन सय्यद, वय- २८ वर्षे, रा. १५ बेगम पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) इक्बाल सय्यद, २) महाफिज सय्यद, ३) सफदर सय्यद, सर्व रा. बेगम पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील नमुद आरोपीत मजकुर यांनी डिजीटल फ्लेक्स लावण्याचे वादातुन फिर्यादीस, वडील जाकीर, भाऊ मोहसीन सर्वांना हॉकी स्टीक ने मारहाण करुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ६०२ राठोड- ९८९०९३५४९२ |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४०४/२०२५ भा.न्या.सहिता कलम ११८(१),११५(२)३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/०७/२०२५ रोजी १५.१५ वा चे सुमारास, बेगम पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०७/२०२५ रोजी २०.१४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सफदार ईक्बाल अहमद सय्यद, रा. बेगम पेठ, अजिज प्लाझा समोर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) जाकीर बडेसाब सय्यद, २) शोएब जाकीर सय्यद, ३) मुजीब जाकीर सय्द, रा. अंबिका नगर, नई जिंदगी सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे दानिस आरीस या लग्न पत्रिका छापण्याचे दुकानात असताना चुलत भाऊ यातील नमुद आरोपीत मजकुर यांनी मिळुन येवून फिर्यादीस तु या मोकळया जागेच्या भिंतीवर डिजीटल पोस्टर लावु नको असे म्हणून फिर्यादीचे डोक्यात प्लॅस्टिक पाईपने मारुन जखमी केले. त्यावेळी फिर्यादीचा भाऊ मुहाफिज सय्यद हा भांडण सोडविण्यासाठी आला असता त्यास आरोपीत क्रं. ३ याने त्याचे हातातील लोखंडी सळईने डोक्यात मारुन जखमी केले व वडील इक्बाल यांना आरोपीत क्रं १ याने शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १३८० मस्के- ८३२९६०५५९९ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६५९/२०२५ भा.न्या.सहिता कलम ११८(१),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २०/०७/२०२५ रोजी १६.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०७/२०२५ रोजी १५.०९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अनिल सिद्राम मुशन, रा. १९ गंगा चौक भाग-४, निलम नगर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) स्वाती अनिल मुशन, २) कांचन निखील कांबळे, ३) निखीन साने, रा. निल नगर, गंगा चौक, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची त्यांची बायकोसोबत बोलत थांबले असता, नमुद आरोपीत यांनी तु वारंवार तुझ्या बायको सोबत भांडण का करतो, तुला लय मस्ती आली आहे असे म्हणून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन तसेच आरोपीत क्रं. १ हिने तेथेच पडलेला लोखंडी वस्तुने जोरात फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ५१२ गायकवाड- ९६२३३३०२२२ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३३३/२०२५ भा.न्या.सहिता कलम ८५,११८(१),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०८/०६/२००९ ते आजतागायत, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०७/२०२५ रोजी १९.२२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सविता विरेश राठीमणी, वय- ३६ वर्षे, रा. माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) विरेश सिद्रामय्या राठीमनी, २) सोनाली पाटील, पुर्ण नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी वेळोवेळी फिर्यादीस माहेरुन नविन चारचाकी वाहन घेण्यासाठी ५ लाख रुपये घेवून ये व हुंडयाची मागणी करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १२०१ जाधव- ९८५०६६०२९९ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५२९/२०२५ भा.न्या.सहिता कलम ११८(१),३३३,११५(२),३५२,,३५१(२),१८९(२),१९१(२),१९० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/०७/२०२५ रोजी १३.३० वा चे सुमारास, घर नं. ८०, शुक्रवार पेठ, भांडी गल्ली, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०७/२०२५ रोजी २२.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अनुपमा महेश नरखेडकर, वय- ४६ वर्षे, रा. घर नं. ८०, शुक्रवार पेठ, भांडी |

| | | |
|---|---|---|
| | | गल्ली, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) उमेश हरिभाऊ नरखेडकर, २) रुक्मीणी हरिभाऊ नरखेडकर, दोघे रा. ११७, उमा नगरी, मुरारजी पेठ, सोलापूर ३) शोभा कापसे व ४) दोन अनोळखी इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व मुलगा असे राहते घरी असताना फिर्यादीचे दिर आरोपीत क्रं. १ व सासु आरोपीत क्रं. २ त्यांचे घरी काम करणारी बाई आरोपीत क्रं. ३ व इतर दोन अनोळखी इसम असे मिळुन फिर्यादीचे घरी आले. आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस तु माझ्या विरुध्द कोर्टात केस का केली असे म्हणत शिव्या देण्यास सुरुवात केली. त्यांचे सोबत असलेलया दोन अनोळखी इसमांना फिर्यादी आमच्या घरात कशाला आलात असे विचारले असता त्या दोघांनी फिर्यादीचा मुलगा श्रीकांत यास पकडले. त्यावेळी आरोपीत क्रं. १ याने किचन मधील स्टीलच्या झाराने हातात घेवून श्रीकांत याचे उजव्या हातावर, डाव्या पायाच्या गुडघ्यावर, उजव्या पायावर मारला. त्यावेळी मुलगा खाली पडला तरी देखील आरोपीत क्रं. १ याने मुलाला मारहाण केली. त्यामुळे फिर्यादी या घरातील मधल्या गेट मध्ये गेल्या असता, आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीचा पदर ओढला व फिर्यादी खाली पडल्या त्यामध्ये फिर्यादीच्या गळयातील मंगळसुत्र तुटुन कोठेतरी पडुन नुकसान होवून गहाळ झाले आहे. त्यावेळी तेथे रस्त्याने जाणारे लोकांची गर्दी झाली त्यावेळी आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस व मुलाला त्यांचेविरुध्द केलेली कोर्ट केस परत घ्या नाहीतर तुम्हाला खल्लास करेन अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीचा मुलगा श्रीकांत याने डायल ११२ ला कॉल केला. थोडया वेळाने फिर्यादीच्या घरी पोलीस आले, त्यावेळी सर्वजन घरातुन निघुन गेले आहेत म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १३८५ कसबे- ८८३०३८३२३३ |